महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN No. U40109MH2005SGC153646)
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
**कार्यकारी अभियंता**
अति.उच्च दाब संचलन व सुव्यवस्था विभाग-१,पुणे यांचे कार्यालय
प्रशासकीय इमारत, ब्लॉक नं.४०६, ३रा मजला, रास्ता पेठ,पुणे-४११०११
☎(का)२६०६१३६२ Email : ee6140@mahatransco.in

संदर्भ : काअ/अउदा/संवसु/विभाग -१/पुणे/मासं/ No - 1850 दिनांक :- 14 OCT 2024

# शिकाऊ उमेदवारांसाठी जाहीर सूचना

सन २०२३-२०२४ साली सुरू झालेला शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षण कालावधी दि. २६/११/२०२४ रोजी संपुष्ठात येणार असल्याकारणाने ITI (Electrician) उत्तीर्ण उमेदवारांना याद्वारे सुचित करण्यात येते की, म.रा.वि.विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग -१, पुणे कार्यालयामार्फत सन २०२४-२०२५ या कालावधीसाठी शिकाऊ उमेदवार (Apprentice) उमेदवारांना एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहुन कराराबध्द करण्यात येणार आहे.

०१. एकूण पदांची संख्या :- २९

०२. उमेदवारांनी इयत्ता १० वी उत्तीर्ण चे गुणपत्रक (Marksheet) व मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षांचा आयटीआय (वीजतंत्री) परिक्षा उत्तीर्ण केल्याचे सर्व सेमीस्टरचे एकत्रित गुणपत्रक, आधारकार्ड अपलोड करणे आवश्यक आहे.

०३ आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी ऑनलाईन् अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र /आर्थिकदृष्टया दुर्बल असल्याचे प्रमाणपत्र (EWS) (स्कॅन कॉपी ) सादर करणे आवश्यक आहे.

०४. कामाचे ठिकाण :- अउदा संवसु विभाग - १, पुणे अंतर्गत विविध उपकेंद्र.

०५. वयोमर्यादा :- वर्ष १८ ते ३० (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम).

०६. प्रशिक्षण कालावधीत कंपनी नियमांप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.

०७. अर्जदाराने महाराष्ट्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org या वेबसाईवर नोंदणी करणे बंधन कारक असून दिनांक १५.१०.२०२४ ते ३१.१०.२०२४ या कालावधीत https://apprenticeshipindia.gov.inapprenticeship/opportunity या लिंकवरुन (Estb.code) E10202700045 या आस्थापनेवर आवश्यक माहिती नमूद करुन अर्ज सादर करणे अनिवार्य असेल.

०८. सर्व अर्जदारांना कळविण्यात येते की, दि.११.११.२०२४ रोजी सर्व मूळ कागदपत्रांसह व दोन छायांकित प्रतिसह निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्त्यावर ठिक सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

०९. सदर प्रक्रियेमध्ये पुण्यामधील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

१०. प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याने प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रे अपलोड न केल्यास नोंदणीधारकांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविण्यात येईल, तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

११. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता,
अउदा संवसु विभाग -१, पुणे.